महाराष्ट्र शासन
सूचना का अधिकार
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवसं/तात्पुरतीपदोन्नती/अंखोसहा/७-फ/८०८८/२०२०, दि.२४/१२/२०२०,

कार्यालयीन आदेश

विषय : वर्ग-४ (गट-ड) या संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार अंधारखोली सहाय्यक (वेतनबँड एस - ६: रु. १९,९००-६३,२००/-) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती प्रदान करण्याबाबत . . .

संदर्भ : शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. एमईएस-२४०१/(२४९)/वैसेवा-१, दि. २ एप्रिल, २००४

२. साप्रवि, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि. १२/९/२०१६

३. सामान्य प्रशासन विभाग , शासन पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि. २९ डिसेंबर, २०१७

संचालनालय व संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये/ रुग्णालये तसेच शासकीय दंत महाविद्यालये व रुग्णालये यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या आणि विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या दिनांक ०१/०१/२०२० रोजीच्या ज्येष्ठता सूचीतील वर्ग-४ (गट-ड) या संवर्गात कार्यरत असलेल्या व अंधारखोली सहाय्यक या पदावर पदोन्नती करीता विकल्प दिलेल्या व पात्र असलेल्या खालील कर्मचाऱ्यांना "अंधारखोली सहाय्यक" (वेतनबँड एस - ६: रु. १९,९००-६३,२००/-) या वेतन श्रेणीतील पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या संस्थेत संदर्भ क्र. ०३ मधील सूचनेच्या अधीन राहून पुढिल आदेशापर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र | कर्मचाऱ्याचे नांव व पदनाम | जातीचा प्रवर्ग | पदोन्नती प्रवर्ग | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नांव | पदोन्नती प्रदान करण्यात आलेल्या संस्थेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती पुष्पा अशोक झाडे, कक्षसेवक | इमाव | खुला | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ |
| ०२ | श्री. रविंद्र हिम्मत बोरसे,क्षकिरण परिचर | इमाव | खुला | सर्वोपचार रुग्णालय, धुळे | श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे |
| ०३ | श्री. लक्ष्मीकांत रंगनाथ जोशी, अंधारखोली परिचर | खुला | खुला | स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई | स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई |
| ०४ | श्री. गजानन दगडु देवडे, क्ष किरण परिचर | इमाव | खुला | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ. |
| ०५ | श्री. प्रभाकर जानकीराम साखरे, शिपाई | इमाव | खुला | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ |

१. निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नत्या ह्या वर्ग-४ (गट-ड) या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या अंधारखोली सहाय्यक पदासाठी दिलेल्या विकल्पानुसार व पात्र कर्मचाऱ्यांच्या दि. ०१/०१/२०२० रोजीच्या अंतिम सेवाज्येष्ठतेनुसार व विभागीय पदोन्नती सिमितीच्या शिफारशीनुसार प्रदान करण्यात येत आहेत. ज्येष्ठतेनुसार ज्या कर्मचाऱ्यास पदोन्नती प्रदान करण्यात आलेली नाही व जर तो पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्याला नियमानुसार पदोन्नती प्रदान करण्यात येईल व त्याची ज्येष्ठता अबाधित राहिल. याबाबतचा निर्णय संचालनालयाच्या स्तरावर घेण्यात येईल.

२. उक्त आदेशातील ज्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमुळे मुख्यालय/कार्यालयाच्या ठिकाणी बदल होत आहे, त्यांना नियमानुसार प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहिल व ज्या कर्मचाऱ्यांच्या मुख्यालय/कार्यालयाच्या ठिकाणी बदल होत नाही त्यांना नियमानुसार प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहाणार नाही.

३. उक्त नमुद पैकी ज्या कर्मचाऱ्याविरुद्ध आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही. तसेच, निलंबन, विनापरवानगी गैरहजेरी नाही याची खातरजमा करावी. यापैकी काहीही आढळल्यास तसा अहवाल संचालनालयास सादर करावा.

४. या निव्वळ तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

५. सदर अंधारखोली सहाय्यक पदावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि. २९ डिसेंबर, २०१७ मधील सुचनेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

६. संस्था प्रमुखांना सुचना देण्यात येत आहेत की, उपरोक्त निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती दिलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे.

७. शासन निर्णय क्र. एसआरव्ही२०१५/प्र.क्र.३०३/का, दि. १२/०९/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार / असंमती दर्शविल्यास त्याबाबतचा अहवाल आदेशाच्या दिनांकापासून दोन दिवसांचे आत संचालनालयास सादर करावा. सदरील कर्मचाऱ्याचे नांव पदोन्नतीस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढिल दोन वर्षी होणाऱ्या निवड सुच्यांमध्ये संबंधित कर्मचाऱ्याच्या नांवाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवड सूचीत संबंधित कर्मचाऱ्याची पात्रता तपासून त्यावेळच्या गुणवत्तेप्रमाणे पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास त्याचा नियमित निवड सूचीत समावेश करण्यात येईल. तसेच, या शासन निर्णयातील इतर तरतुदी देखील उक्त कर्मचाऱ्यांना लागू रहातील.

८. तसेच संस्था प्रमुखांना सुचना देण्यात येतात की, जे कर्मचारी पदोन्नती स्वीकारण्यास असंमती दर्शवतील अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकामध्ये त्यांना देण्यात आलेली पदोन्नती त्यांनी नाकारल्याची नोंद लाल अक्षरांत घेण्यात यावी व सदर नोंद घेण्यात आलेल्या सेवा पुस्तकाच्या पृष्ठाची छायाप्रत या संचालनालयास तात्काळ सादर करावी.

९. उपरोक्त निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती स्वीकारण्यास कर्मचारी इच्छुक आहे किंवा नाही याबाबत त्यांनी स्वत: संमती / असंमती पत्र सदर आदेशाच्या दिनांकापासून दोन दिवसांत ईमेल fbranchdmer@gmail.com द्वारे या संचालनालयास सादर करावे व विहित कालावधीत पदोन्नती प्रदान करण्यात आलेल्या संस्थेत रुजू व्हावे. दोन दिवसांच्या आत संमती / असंमती पत्र प्राप्त न झाल्यास सदरहु कर्मचारी पदोन्नतीस इच्छुक नाही असे समजून त्यांना देण्यात आलेली पदोन्नती रद्द समजण्यात येईल व मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेण्यात येणार नाही व त्यांच्या पुढिल सेवा ज्येष्ठता कर्मचाऱ्यास पदोन्नती प्रदान करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यावर राहिल.

१०. सदरील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या ह्या गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व विवरणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयाच्या ५०/५५ वर्षानंतर वैद्यकीय दृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास) इ. संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेल्या माहितीच्या अधीन राहून देण्यात येत आहे. भविष्यात याबाबत विसंगती किंवा सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास पदोन्नती तात्काळ रद्द करण्यात येईल.

११. सदरील अंधारखोली सहाय्यक आदेशात रकाना क्र. ४ मध्ये अनावधानाने कार्यरत संस्था चुकीची दर्शविली असल्यास त्याची सुधारणा संस्थास्तरावर करण्यात यावी. त्याकरीता शुध्दीपत्रकासाठी या संचालनालयास पत्रव्यवहार करु नये. संस्थास्तरावर केलेली सुधारणा संबंधित कर्मचाऱ्यास कार्यमुक्त केल्याच्या आदेशाच्या प्रतीत दर्शविण्यात यावी.

१२. संबंधित संस्था प्रमुख यांना निर्देश देण्यात येत आहे, की सदरील आदेशानुसार कर्मचारी हजर झाल्यास रुजूता अहवाल दोन दिवसांत संचालनालयाच्या fbranchdmer@gmail.com या ईमेल द्वारे संचालनालयास सादर करावा.

संचालक,
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

प्रति,
उक्त सर्व कर्मचारी यांना (अधिष्ठाता यांचेमार्फत) अग्रेषित

प्रत : मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, प्रशासकीय भवन इमारत, ९ वा मजला, गो. ते. रुग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव रवाना

प्रत :

१. अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ
२. अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ
३. अधिष्ठाता, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे
४. अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे
५. अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई
६. अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई
७. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ/ धुळे / अंबाजोगाई
८. मा. महालेखापाल-२, नागपूर
९. पदोन्नती नस्ती
१०. बिंदू नामावली विभाग (फ-कार्यासन)
११. निवड नस्ती
१२. सांख्यिकी विभाग, संचालनालय, वै. शि. व संशोधन, मुंबई